## दिव्यातील विद्यार्थ्यांचे भवितव्य खराब होऊ देणार नाही -रमाकांत मढवी


# दिवा न्यूज
दिशादर्शक, मार्गदर्शक!

वर्ष-४
अंक - ४५
epaper.diwanews.com

www.diwanews.com ♦ सोमवार,९ जून २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किंमत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


**दिवा:-** शहरात अनधिकृत शाळांचा विषय चांगलाच चर्चेला आला असून काही मान्यता प्राप्त शाळा आणि काही राजकीय पक्षांनी अनधिकृत शाळा बंद कराव्यात यासाठी कंबर कसली आहे. अशातच काल खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या सूचनेनुसार शिवसेना शहरप्रमुख, माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली तीस पेक्षा जास्त शाळांच्या संचालकांनी पालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेतली. (पान ३ वर)

# दिवा शहरात शिक्षणाचा बट्ट्याबोळ कोणी केला?



## दरवर्षी वाढणारी अनधिकृत शाळांची यादी,महापालिकेने याचं आत्मपरीक्षण करावं

**दिवा शहर परिसरात महापालिकेच्या शाळांची संख्या ६, अनधिकृत शाळांची संख्या ५५ च्या वर ...**

दिवा प्रभाग समिती हद्दीमध्ये महापालिकेच्या एकूण १४ शाळा आहेत, तर दिवा शहर परिसरात अवघ्या सहा शाळा महापालिकेच्या असल्याचे समोर येत आहे. एकीकडे दिवा शहराची लोकसंख्या वाढलेली असताना शहरातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यास महापालिका का दुर्लक्ष करते ? हा प्रश्न या निमित्ताने निर्माण होत आहे. शहरातील विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यास महापालिका अपयशी ठरल्याने दिवा शहरात सर्वाधिक अनधिकृत शाळा वाढल्या असं म्हणण्यास यामुळेच वाव आहे.

## दिव्यात शैक्षणिक सुविधाच अपुऱ्या असतील तर विद्यार्थी शिक्षण घेणार कुठे?

**दिवा न्यूज विशेष**

दिवा शहराची भौगोलिक परिस्थिती पाहिली तर डोंबिवली ठाणे, कळवा, मुंब्रा येथे अधिकृत शाळांमध्ये मोठ्या संख्येने लहान मुलं ट्रेनने जाऊन शिक्षण घेण्यासारखी स्थिती नाही. चांगल्या शैक्षणिक सोयी सुविधांसाठी काही पालक आपल्या मुलांना डोंबिवली येथे ट्रेनने घेऊन जातात.पण या पालकांची प्रचंड धावपळ यामध्ये होते.

दिवा शहरात असणाऱ्या पालिकेच्या पूर्वीच्या शाळा या सर्वच सुस्थितीत आहेत असे नाही. मुळात शहरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याकडे महापालिकेने मागील काही वर्षात दुर्लक्षच केल्याचे त्यांच्या धोरणावरून लक्षात येते.एकीकडे तुम्ही दिवा शहरात महापालिका शाळांची संख्या वाढवण्यास अपयशी ठरलात आणि दुसरीकडे दरवर्षी दिवा शहरात वाढणाऱ्या अनधिकृत शाळांना रोखण्यातही अपयशी ठरलात.शहराची पालक संस्था म्हणून कोणती जबाबदारी तुम्ही पार पडलीत ? दरवर्षी केवळ अनधिकृत शाळांचे बॅनर लावून तुम्हाला जबाबदारी झटकता येणार नाही.

दर वर्षी वाढत्या अनधिकृत शाळांची संख्या पाहिली तर महापालिकेच्या शिक्षण विभागाचे अधिकारी हे सर्वसामान्यांच्या शैक्षणिक भविष्याची काळजी घेणारे नाहीत असेच म्हणावे लागेल.ठाण्यातील एसी केबिन मध्ये बसून दिव्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या मुलांचे शैक्षणिक भविष्य या अधिकाऱ्यांना कसे दिसणार ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

मागील पंधरा वर्षात दिवा शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढली.या वाढत्या लोकसंख्येला शैक्षणिक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या नाहीत तर येथे शिक्षणाचा बट्ट्याबोळ होईल, याची कल्पना जर ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाला आली नसेल तर असे शिक्षण विभागातील अधिकारी नेमकं काय काम करतात ? हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो. वाढणाऱ्या लोकसंख्येच्या तुलनेत विद्यार्थी संख्या वाढेल आणि त्या वाढलेल्या विद्यार्थ्यांना आपण महापालिका म्हणून शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत ही खरंतर महापालिकेची नैतिक जबाबदारी आहे.मात्र असं असताना शहराच्या भविष्याकडे दुर्लक्ष करणारे अधिकारी आज दुर्दैवाने महापालिका प्रशासनात बसले आहेत का ? असाही प्रश्न पडतो. ज्या अनधिकृत शाळा दिवा शहरांमध्ये वाढल्या त्या पैकी काही शाळा या मागील काही वर्षापासून सुरू आहेत. दिव्यात हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या मान्यताप्राप्त खाजगी शाळा आहेत.अनधिकृत शाळा म्हणून ज्यांची नोंद आहे, त्यातील काही शाळा या महापालिकेच्या वेबसाईटवर दाखवल्या जात होत्या. जर काही तांत्रिक अडचणींमुळे या शाळांच्या मान्यता रखडल्या असतील तर त्या पूर्ण करणे ही जबाबदारी ठाणे महानगरपालिका प्रशासन आणि राज्य शासनाच्या शिक्षण विभागाची आहे.वाढत्या शहरांमध्ये जागे अभावी काही शाळा या नियमात बसत नसतील तर त्यासाठी पर्यायी व्यवस्था काय याचा विचारही शासनकर्त्यांनी करायला हवा.

दिव्यासारखे शहर हे दाटीवाटीने वसलेले आहे. मोठी शैक्षणिक संकुल उभारण्यासाठी आज शहरात जागा उपलब्ध नाही.त्यामुळे या शहरात शासनाच्या निकषात बसणाऱ्याच शाळा सुरू होतील अशी स्थिती सध्या नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य लक्षात घेऊन महापालिकेने यावर तोडगा काढायला हवा.एक तर स्वत:च्या शाळा दिवा शहरात वाढवायला हव्यात. असलेल्या शाळांमध्ये वर्ग संख्या वाढवायला हवी. दर्जेदार शिक्षण दिवा शहरातील विद्यार्थ्यांना देण्याचे काम महापालिका प्रशासनाने करायला हवं. आपल्या मर्यादा लक्षात घेऊन ज्या शाळांना मान्यता देणे शक्य आहे, अशा शाळांच्या प्रस्तावाचा पुनर्विचार महापालिकेने करायला हवा.त्यातून विद्यार्थ्यांचे भविष्य साधलं जाईल हाही विचार बघायला हवा. ज्या खाजगी शाळा सध्या दिव्यामध्ये आहेत त्या शाळांमध्ये अजून काही विद्यार्थी सामावून घेण्याचा प्रयत्न हा स्वागतार्ह आहे. मात्र या शाळांच्या देखील मर्यादा आहेत.त्यामुळे असणाऱ्या मान्यताप्रात खाजगी शाळांमध्ये विद्यार्थी संख्या प्रचंड प्रमाणात वाढल्यास तिथेही विद्यार्थ्यांना सर्वच सुविधा मिळतील असं नाही. ठाण्यासारखी, नवी मुंबईसारखी परिस्थिती दिवा शहरात नाही. परिणामी दिवा शहरातील शैक्षणिक बट्ट्याबोळ निस्तरायचा असेल तर महापालिकेने स्वत:हून दिव्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. राजकीय नेतृत्व,खाजगी शिक्षण संस्थांचे संचालक त्याचबरोबर पालक प्रतिनिधी यांच्याशी संवाद साधून आगामी काळात दिवा शहरातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही यावर तोडगा काढता येईल काय ? या दृष्टीने विचार व्हायला हवा.मुळात महापालिकेने स्वत:चे शैक्षणिक धोरण सक्षम केले तर दिव्यात अनधिकृत शाळांची संख्या वाढणार नाही आणि येथील सर्वसामान्य जनतेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक असुविधा सोसाव्या लागणार नाहीत.आगामी काळात महापालिका याकडे लक्ष घालेल आणि दिवा शहरातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ देणार नाही ही अपेक्षा करायला हरकत नाही.

# डॉ. श्रीकांत शिंदे यांनी १४० कोटी भारतीयांची भूमिका मांडली

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून खासदार डॉ. शिंदे यांचे कौतुक

**मुंबई :-** परदेशात खासदारांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करताना शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ऑपरेशन सिंदूरसंदर्भात १४० कोटी भारतीयांची भूमिका आंतरराष्ट्रीय मंचावर समर्थपणे मांडली. एक वडील म्हणून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा अभिमान वाटतो, अशा शब्दांत राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी कौतुक केले. तब्बल दोन आठवड्यांच्या परदेश दौऱ्यानंतर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे बुधवारी रात्री मुंबईतील मुक्तागिरी निवासस्थानी परतले. त्यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आज सर्वांसाठी आनंदाचा दिवस आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि त्यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळ आज मायदेशी परतले. चार देशांच्या दौऱ्यात खासदार डॉ. शिंदे यांना १४० कोटी भारतीयांची भूमिका मांडण्याची संधी मिळाली. ही भूमिका खासदार डॉ. शिंदे यांनी समर्थपणे बजावली, त्याचा अभिमान वाटतो, अशी भावना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली. वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर मेडिकल प्रॅक्टिसऐवजी डॉ. श्रीकांतला राजकारणासारख्या वेगळ्या क्षेत्रात आणले का, असा आपला समज झाला होता, मात्र आज खऱ्या अर्थाने खासदार डॉ. शिंदे यांनी हा निर्णय योग्य ठरवला. खासदार डॉ. शिंदे यांनी या दौऱ्यात केवळ भारताची बाजू उत्कृष्टपणे मांडली नाही तर चारही देशांचा भारताच्या बाजूने पाठिंबा मिळवला, हे बघून कोणाचेही उर अभिमानाने भरुन येईल, अशीच आपली अवस्था असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. या शिष्टमंडळात अहलुवालियांसारखे ज्येष्ठ नेते होते. तरुणांना नेतृत्वाची संधी देण्याबरोबरच ज्येष्ठांना मार्गदर्शनासाठी सोबत पाठवणे यातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्यापक दृष्टीकोन दिसून आला, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. ते पुढे म्हणाले की, एनडीए बैठकीत ऑपरेशन सिंदूरचा प्रस्ताव मांडण्याची आपल्याला संधी दिली तर डॉ. श्रीकांत शिंदे या युवा खासदार विश्वास ठेवून त्याला शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याची संधी दिली, त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आभार मानले.

### आंतरराष्ट्रीय मंचावर डॉ. श्रीकांत यांचे नेतृत्व अभिमानास्पद

### युवा नेतृत्वाला संधी देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मानले आभार

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, दहशतवादाविरोधात भारताची भूमिका आणि ऑपरेशन सिंदूरसंदर्भात जगभरातील जवळपास ३४ देशांमध्ये खासदारांची विविध शिष्टमंडळे गेली होती. पहलगाममध्ये पाकिस्तान पुरस्कृत हल्ला झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानला चोख उत्तर दिले. निरपराध नागरिकांना न मारता दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले आणि पंतप्रधान मोदी यांनी युद्धनिती दाखवून दिली. ऑपरेशन सिंदूरमध्ये लष्कराचे शौर्य दिसून आले, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य हीच भूमिका भारताची आहे. ही भूमिका जगाला पटवून देण्याचे काम खासदारांच्या शिष्टमंडळाने केले, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

# उपमुख्यमंत्री हरित ठाणे अभियानाचा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते वृक्षारोपणाने झाला शुभारंभ

**ठाणे :-** ठाणे महानगरपालिकेतर्फे जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून 'हरित ठाणे अभियाना'त वर्षभरात दोन लाख झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या अभियानाचा शुभारंभ गुरूवारी सकाळी रेमंड कंपनी येथे महापालिकेच्या नियोजित नवीन वास्तूच्या प्रांगणात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला.

त्याचबरोबर, नौपाडा येथील गावदेवी मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या उत्सव वसुंधरेचा, संकल्प हरित ठाण्याचा अंतर्गत शून्य कचरा आणि पर्यावरणाच्या भव्य प्रदर्शनाचे ऑनलाईन पद्धतीने उद्‌घाटनही त्याचवेळी करण्यात आले. हे प्रदर्शन रविवार, ०८ जूनपर्यंत स. १० ते रा. १० या वेळेत सगळ्यांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

ठाणे आणि परिसरात हरित क्षेत्र वाढवण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून हरित ठाणे अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानाचे हे दुसरे वर्ष आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार उपमुख्यमंत्री हरित ठाणे अभियानाचे नियोजन करण्यात आले आहे.. अभियानाच्या अनुषंगाने दोन लाख पाच हजार झाडे लावण्याचे सविस्तर नियोजन करण्यात आले आहे. त्याची सुरूवात जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आली. त्यांनी राज्य फुल असलेला ताम्हण, बकुळ आणि बांबू प्रजातीमधील तुरडा या तीन वृक्षांचे रोपण करून या अभियानचा आरंभ केला, तसेच, नागरिकांना पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी, महापालिका आयुक्त सौरभ राव, माजी महापौर हरिश्चंद्र पाटील, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, उपायुक्त मधुकर बोडके, उपायुक्त शंकर पाटोळे, सहाय्यक आयुक्त राजेश सोनावणे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे आदी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या अभियानात, ठाण्यात एकूण दोन लाख पाच हजार झाडे लावली जातील. त्यात, मियावाकी पद्धतीने ३० हजार झाडे, विविध विकासकांमार्फत पाच हजार झाडे, खाजगी संस्था, शाळा, महाविद्यालये,




सामाजिक संस्था, निवासी गृहसंकुले आणि शासकीय कार्यालयांच्या सहभागातून पाच हजार झाडे लावण्यात येणार आहेत. तसेच, शेवग्याची १० हजार लावण्यात येणार आहेत. त्याचबरोबर, महापालिकेतर्फे, आतकोली येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प परिसरात बांबू प्रजातींच्या पाच हजार विशेष झाडे लावली जाणार आहेत. प्रादेशिक वन विभागाची जागा व संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथे महापालिकेतर्फे एकूण एक लाख ३० हजार झाडे लावण्याचे नियोजन आहे. कोलशेत एअर फोर्स स्टेशन परिसरात मियावाकी पद्धतीने २०,००० झाडे लावण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. गेल्या वर्षी या अभियानात ठाणे महापालिकेने एकूण एक लाख २७ हजार झाडे लावली.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिवा शहरातील २५ हजार शालेय विद्यार्थ्यांचे भवितव्य खराब होऊ देणार नाही- रमाकांत मढवी

## मान्यता नसलेल्या शाळांना न्याय मिळून देण्यासाठी प्रयत्न करणार,संचालकांच्या शिष्टमंडळाने रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली घेतली पालिका आयुक्तांची भेट.

**दिवा:-** शहरात अनधिकृत शाळांचा विषय चांगलाच चर्चेला आला असून काही मान्यता प्राप्त शाळा आणि काही राजकीय पक्षांनी अनधिकृत शाळा बंद कराव्यात यासाठी कंबर कसली आहे. नुकतेच एका राजकीय पक्षाने न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होत आसल्यामुळे दिवा शहरातील अशा सर्व शाळा ताबडतोब बंद करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी म्हणून शिक्षण अधिकाऱ्यांची भेट घेतली होती. अशातच काल खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या सूचनेनुसार शिवसेना शहरप्रमुख, माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली तीस पेक्षा जास्त शाळांच्या संचालकांनी पालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेतली. यावेळी दिवा शहरातील २५ हजार शालेय विद्यार्थ्यांचे भवितव्य खराब होऊ देणार नाही व मान्यता नसलेल्या शाळांना न्याय मिळून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे शिवसेना दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी यांनी जाहीर केले आहे. दिवा शहरात अनधिकृत इमारतींचा विषय गाजत असताना आता मात्र अनधिकृत शाळांचा विषय चव्हाट्यावर आला आहे. ठाणे महानगर पालिकेने पालिका क्षेत्रातील सर्व अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली आहे यामध्ये दिव्यासाहीत ठाणे महानगर पालिका क्षेत्रातील ८२ शाळांचा या यादीमध्ये समावेश आहे. एकट्या दिवा शहरातील अनाधिकृत शाळांचा विचार केल्यास या शाळांमध्ये आजघडीला २५ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत आणि १२०० शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी काम करत आहेत. मागील दोन वर्षापासून नवीन शाळांच्या मान्यतेची ऑनलाईन प्रक्रिया बंद असल्यामुळे तसेच दिवा शहरात ओसी आणि सीसी घेताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी यामुळे मान्यता प्राप्त करण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत. दिवा शहराची भौगोलिक परिस्थिती बघता व सी.आर.झेड च्या जाचक अटींचा विचार करता येथे अधिकृत शाळा बांधणं हे तांत्रिक दृष्ट्या तरी शक्य नाही. अशातच दिवा शहरात राहण्यासाठी आलेल्या सर्वसामान्य नागरिकांना परवडतील अशा शाळा दिवा शहरात मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या आहेत. अशा शाळांना मान्यता नसल्यामुळे या शाळा बंद कराव्यात अशी मागणी दिवा शहरातीलच काही मान्यता प्राप्त शाळा संचालकांनी व राजकीय पक्षांनी केली असल्यामुळे दिवा शहरातील २५ हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचं भवितव्य टांगणीला लागले आहे. यामुळे सर्व पालक वर्गामध्ये चिंतेचं वातावरण तयार झालं असून आपल्या पाल्याचं शैक्षणिक नुकसान तर होणार नाही ना? या चिंतेने पालक शाळांमध्ये खेटा मारत आहेत. याशिवाय दिव्यातील मान्यता प्राप्त शाळांमधील फी परवडत नसल्यामुळे व घरापासून जवळचे अंतर यामुळे पालकांना आपल्या पाल्यांचे शिक्षण अशा शाळांमध्ये करण्याशिवाय कोणताही पर्याय उपलब्ध नसल्यामुळे मुलांना शिकवायचे कसे? या विचारात सर्व पालक वर्ग आहेत. दिवा शहरातील सर्व अनधिकृत शाळांच्या संचालकांनी खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सुद्धा यापूर्वी दिले होतं. त्यामुळे खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार काल ३० पेक्षा जास्त शाळांच्या संचालकांनी शिवसेना शहर प्रमुख रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेतली, सदर भेटीत सर्व अनाधिकृत शाळांनी मान्यता मिळवण्यासाठी प्रक्रिया सुरू करावी असे आश्वासन पालिका आयुक्तांनी दिले असल्याचे शिवसेना शहर प्रमुख रमाकांत मढवी यांनी सांगितले. दिवावसीयांच्या कठीण काळात शिवसेना ही कायम दिवावासियांच्या सोबत राहिली असून दिवा शहरातील २५ हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचं शैक्षणिक भविष्य खराब होऊ देणार नाही व मान्यता नसलेल्या शाळांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना प्रयत्न करणार असल्याचे देखील रमाकांत मढवी यांनी सांगितले. सर्व शाळांना घेऊन खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय शिक्षण मंत्री नामदार दादा भुसे यांची देखील भेट घेणार असल्याचे रमाकांत मढवी यांनी सांगितले आहे. शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी हे पहिल्या दिवसापासून आमच्या सर्व शाळांच्या पाठीशी उभे आहेत, काल रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली पालिका आयुक्त सौरभ राव यांच्याबरोबर आमची सकारात्मक बैठक झाली. संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि कार्यसम्राट खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना आमच्या पाठीशी असल्यामुळे आमची आणि सर्व पालकवर्गाची चिंता कमी झाली असल्याचे मत भारत इंग्लिश स्कूलचे रवी गायकवाड यांनी व्यक्त केलं.



“

**दिवा शहरातील २५ हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचं शैक्षणिक भविष्य खराब होऊ देणार नाही व मान्यता नसलेल्या शाळांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना प्रयत्न करणार असल्याचे देखील रमाकांत मढवी यांनी सांगितले. सर्व शाळांना घेऊन खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय शिक्षण मंत्री नामदार दादा भुसे यांची देखील भेट घेणार असल्याचे रमाकांत मढवी यांनी सांगितले आहे.**

# प्रशासनाने दिव्यातील समस्या सोडाव्यात अन्यथा मनसे स्टाईलने प्रश्न सोडवू-प्रकाश पाटील

**दिवा:-**मनसेचे विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यालयात शनिवारी जनता दरबार घेतला. यावेळी नागरिकांनी त्यांच्याकडे दिवा स्टेशन रोडवर होणारी वाहतूक कोंडी, फेरीवाल्यांची समस्या, चाळींमध्ये पावसाचे पाणी साचण्याची समस्या, त्याचबरोबर नालीसफाई, उघड्यावर दारू पिणाऱ्यांमुळे होणारा त्रास यासारख्या अनेक विषयांवर शहरातील नागरिकांनी प्रकाश पाटील यांच्याकडे निवेदन दिली. यानंतर प्रकाश पाटील यांनी सदर निवेदने प्रशासनाला देणार असल्याचे सांगून प्रशासनाने यावर कारवाई न केल्यास मनसे स्टाईल आम्ही स्वतः या संदर्भात कारवाई करू असा इशारा यावेळी दिला. नागरिकांनी दिलेल्या निवेदनाच्या आधारे मनसेच्या वतीने दिवा शहरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी पाहणी दौरा आयोजित करण्यात आल्याचेही प्रकाश पाटील यांनी यावेळी सांगितले.

# बांधकामांचा सुकाळ अन् पाण्याची पळवा - पळवी..

## आमदार संजय केळकर घेणार अधिकाऱ्यांची झाडाझडती

**ठाणे**:- ठाण्यात एकीकडे पाण्याची कमतरता असताना दुसरीकडे नव्याने सुरू असलेल्या बांधकामांसाठी पाण्याची पळवा-पळवी सुरू आहे. पाणीपुरवठा नियोजनाचा बट्ट्याबोळ झाला असून सोमवारी अधिकाऱ्यांची बैठक घेणार असल्याची माहिती आमदार संजय केळकर यांनी दिली तर वाढत्या बेकायदा बांधकामांचा मुद्दाही येत्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित करून कठोर कारवाईची मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. जनसेवकाचा जनसंवाद या उपक्रमांतर्गत आमदार संजय केळकर यांनी खोपट येथील भाजप पक्ष कार्यालयात नागरिकांशी संवाद साधत नागरी समस्या ऐकून घेतल्या. काही समस्या तत्काळ फोनवरून सोडवण्यात आल्या तर उर्वरित समस्या पाठपुरावा करून सोडवण्यात येतील, असे श्री.केळकर यांनी सांगितले.

पत्रकारांशी बोलताना श्री.केळकर यांनी ठाण्यात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत नाराजी व्यक्त केली. ३०-३५ बेकायदा बांधकामांची यादीच प्रशासनाला देण्यात आली असून त्यावर तक्रारदाराचे समाधान करण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. न्यायालयाने कान उघडणी केल्यावरच कारवाई केली जाते. या इमारतींना देण्यात आलेले पाणी आणि वीज तत्काळ तोडण्यात यावी. येत्या अधिवेशनात याबाबत आवाज उठवून अशा बांधकामांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करणार असल्याचे श्री.केळकर यांनी सांगितले. शहरात



पाण्याची कमतरता असून आवश्यक तेथे बोअरही खणलेल्या नाहीत. अशावेळी बांधकामेही मोठ्या प्रमाणात वाढत असून त्यांना बेसुमार पाणी पुरवठा केला जात आहे. याकरिता पाण्याची पळवा-पळवी करण्यात येत असल्याने अनेक भागात पाण्याची कमतरता भासत आहे. पाणी पुरवठ्याचे नियोजन कोसळले असून याबाबत सोमवारी अधिकाऱ्यांची बैठक बोलावण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. सफाई कामगारांच्या वारसा हक्काचा प्रश्न अधिवेशनात लावून धरत सातत्याने पाठपुरावा केल्याने राज्यातील सुमारे ५० हजार कामगारांना वारसा हक्काचा लाभ मिळाला आहे. काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जाणीवपूर्वक लाभार्थ्यांना ऑर्डर देण्यात चालढकल होत असल्याचा आरोप आमदार संजय केळकर यांनी केला. अंबरनाथ नगरपालिकेतील ४७ लाभार्थ्यांच्या ऑर्डर काढण्यात येणार आहेत. इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ऑर्डर काढण्यासाठी मी पाठपुरावा करत आहे. ठाणे महापालिकेतील सफाई कामगारांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरू आहे. सर्वांना हा लाभ मिळेपर्यंत मी प्रयत्नशील राहीन, असे श्री. केळकर म्हणाले.

# पूर्वीचे स्थगिती सरकार आताचे प्रगती सरकार!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ठाकरे गटाला टोला

**ठाणे** :- एखाद्याला शब्द दिला तर तो पूर्ण करतो, हे मुख्यमंत्री असताना मागील अडीच वर्षात महाराष्ट्रातील जनतेने पाहिलं आणि अनुभवलं. पूर्वीचे स्थगिती सरकार होते तर महायुतीचे प्रगतीचे आणि समृद्धीचे सरकार आहे, असा टोला शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठाला लगावला. माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्यासह अहिल्यानगरमधील श्रीरामपूरच्या शेकडो कार्यकर्त्यांनी तसेच ठाणे जिल्ह्यातील शहपूरमधील सुमारे ७०० कार्यकर्त्यांनी आज उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्यात उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी शिवसेना सचिव राम रेपाळे, सचिव संजय मोरे, शिवसेना प्रवक्ते राहुल लोंढे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांचे विचार पुढे घेऊन चाललोय. मुख्यमंत्री असताना राज्यात लाडकी बहिण, लाडका भाऊ, लाडक्या शेतकऱ्यांसाठी व ज्येष्ठांसाठी कल्याणकारी योजना आणल्या. त्यामुळेच महायुतीला विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक बहुमत मिळाले. आताही महायुतीची दुसरी इनिंग सुरु आहे, देवेंद्रजी आणि आमची टीम महाराष्ट्राला पुढे नेतेय. या राज्याचा विकास, प्रगती झाली पाहिजे आणि सर्वसामान्य माणूस विकासाच्या मुख्य प्रवाहात आला पाहिजे, या हेतूने सरकार काम करत आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. माजी आमदार भानुदास मुरकुटे, नीरज मुरकुटे, संजय छल्लारे, सिद्धांत छल्लारे, लक्ष्मण कुमावत, भगवान उपाध्ये, शेखर दुब्बैया, तेजस बोरावके, रोहित नाईक, संजय साळवे, संजय परदेशी, महेंद्र टाटिया यांच्यासह श्रीरामपूर विधानसभा मतदार संघातील शेकडो सहकारी, अनेक माजी पंचायत समिती सदस्य, माजी जिप सदस्य, सरपंच, उपसरपंच तसेच शेकडो सामाजिक कार्यकर्ते, विदर्भ शिक्षक संघटनेचे डॉ. दिलीप सूर्यवंशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी आज उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेना ठाणे ग्रामीण जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे आणि प्रकाश पाटील यांच्या नेतृत्वात शहापूर तालुक्यातील उबाठा गटाच्या जवळपास ७०० कार्यकर्त्यांनी आज



**माजी आमदार भानुदास मुरकुटे यांचा शिवसेनेत प्रवेश**
**अहिल्यानगर आणि ठाणे जिल्ह्यात उबाठा गटाला खिंडार**
**शहापूरमधील उबाठाच्या ७०० कार्यकर्त्यांनी हाती घेतले शिवधनुष्य**

धनुष्यबाण हाती घेतला. तसेच लातूरमधील महिला भगिनींनी आज उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. उच्चशिक्षित तरुण राजकारणात येणं ही काळाची गरजधनुष्यबाण हाती घेण्या भानुदास मुरकुटे यांचा नातू नीरज मुरकुटे याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी विशेष कौतुक केले. नीरज मुरकुटे हा ऑस्ट्रेलियातील सिडनी विद्यापीठातून उच्च शिक्षण घेऊन आला आहे. त्याने शिवसेनेत काम करण्याची इच्छा व्यक्त केली. समाजाच्या दृष्टीने उच्चशिक्षित पिढी राजकारणात येणं, ही काळाजी गरज आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. यानिमित्ताने उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, शिवसेनेचे युवा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे देखील नुकताच चार देशांचा दौरा करुन मायदेशी परतले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ. श्रीकांत यांनी खासदारांच्या शिष्टमंडळाचे यशस्वी नेतृत्व केलं आणि परदेशात ऑपरेशन सिंदूरबाबत भारताची भूमिका पटवून दिली. या चारही देशांनी भारताला पाठिंबा दिला आणि पाकिस्तानला विरोध केला. पाकिस्तानचा खरा चेहरा उघडा करण्याचे काम या शिष्टमंडळाने केले, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

# वैयक्तिक आकसापोटीच कावेसर तलाव उद्यानाच्या सुशोभिकरणाला विरोध

## हिरानंदानी इस्टेट आणि परिसरातील रहिवाशांचा दावा

**ठाणे :-** कावेसर तलाव उद्यानाचे सुशोभिकरण ही हिरानंदानी इस्टेट आणि परिसरातील रहिवाशांची मागणी आहे. मात्र गेली १० वर्ष विभागातील कोणतीच विकासकामे न केलेल्या एका राजकीय पुढ्याने काही नागरिकांना हाताशी धरुन रहिवाशांमध्ये संभ्रम निर्माण करत आहेत. याच विभागातील लोकप्रतिनिधिनी सुशोभिकरण कामाच्या भूमिपूजनाला उपस्थित राहत सुशोभिकरण कामाचे स्वागत केले आहे. उद्यानाचे सुशोभिकरण झाल्यास तलावाचे सौंदर्य खुलेल आणि सुरक्षितता अधिक वाढेल, असा विश्वास येथील रहिवाशांनी आज पत्रकार परिषद घेत व्यक्त केला.

हिरानंदानी इस्टेट मध्ये हिरानंदानी सिनिअर सिटीझन फाऊंडेशन, राष्ट्रीय योग ध्यान केंद्र, क्लब आणि सामाजिक संस्था आहेत. त्यांनी ठाणे महापालिकेचे सार्वजनिक उद्यानाचे जे कावेसर तलावाच्या शेजारी आहे त्याचे सुशोभिकरण व्हावे, अशी मागणी लेखी पत्राद्वारे केली होती. त्या अनुषंगाने खासदार नरेश म्हस्के यांनी निधी उपलब्ध करुन दिला आहे व ठाणे महापालिकेच्या माध्यमातून उद्यानाचे सुशोभिकरण होणार आहे. उद्यानात सद्यस्थितीत चालायला निट जागा नाही. पायवाट निसरडी असल्याने ज्येष्ठ नागरिकांचा चालताना तोल जातो. सापांचा येथे वावर आहे. त्यामुळे येथे चांगली पायवाट असणे आवश्यक आहे. हिरानंदानी इस्टेट मधील रहिवाशांच्या विनंती वरुनच ठाणे महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण, प्रदुषण नियंत्रण विभागाने एकत्र बसून उद्यान प्रकल्प आराखडा बनवला. मात्र आपली पोळी भाजण्यासाठी सुशोभिकरणाला विरोध होत आहे. 'कावेसर लेक क्राँकिटायझेशन' असा ते अपप्रचार करत आहेत. वास्तविक 'कावेसर गार्डन ब्युटिफिकेशन' असे वास्तव आहे. जर नागरिकांच्या काही सूचना असतील तर त्याचे स्वागतच आहे असे प्रवीण नागरे म्हणाले. गेली अनेक वर्ष तलावाची



आम्हीच देखरेख करत आलो आहोत. विविध भारतीय जातीचे झाडे आम्ही येथे लावली आहेत. झाडांना बारकोड लावले आहेत. फुलपाखरु उद्यान आम्ही उभारले आहे. येथील तलावातून उन्हाळ्यात काही जण पाण्याचा उपसा करायचे. त्याला आम्ही प्रतिबंध घातला. त्यामुळेच हा पुढारी आता विकासाला विरोध करत आहे. गैरसमज पसरवून हा पुढारी रहिवाशांची माथी भडकवित असल्याचे प्रवीण नागरे यांनी सांगितले.

सुशोभिकरण करतांना कावेसर तलावात कोणतीही छेडछाड केली जाणार नाही. जैवविविधतेला कोणतीही बाधा न आणता सुशोभिकरण होणार आहे. जैवविविधता राखणे आमचे कर्तव्यच आहे. जागतिक पर्यावरण दिनी आम्ही तलावाच्या किनारी वृक्षारोपण करणार होतो त्यालाही या पुढ्याने विरोध केला. कोरोना काळात हिरानंदानी इस्टेट येथील गेट जवळ आम्ही व्हॅक्सीनेशन सेंटर उघडले मात्र त्याला विरोध करत ही वास्तू अन्नदान छत्राच्या नावाखाली बळकावण्याचा प्रयत्न या पुढ्याने केला. मोफत आरोग्य केंद्र सुरु करणार होतो त्यालाही विरोध त्याने केला. हिरानंदानी इस्टेट मधील रहिवाशांनी एकत्र येऊन हॅप्पी स्ट्रीट ही संकल्पना आम्ही येथे चालवतो मात्र त्यालाही विराध केला जात आहे. याच पुढ्याने ब्रह्मांड तलावाचे सुशोभिकरण करतांना अर्धा तलाव काँक्रिटने गिळंकृत केला. तेव्हा या पुढ्याविरोधात या पर्यावरणप्रेमींनी विरोध का केला नाही ? असा सवाल प्रविण नागरे यांनी उपस्थित केला आहे.

एका पुढ्याच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाल्याने प्रकल्पाला विरोध सुरु आहे, असे हिरानंदानी ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष धर्मप्रकाश त्रिपाठी म्हणाले. तर हिरानंदानी इस्टेटमध्ये मी अनेक वर्ष राहतो. येथे तलाव आहे हेच आम्हाला माहिती नव्हते. प्रविण नागरे यांच्या टिमने येथे मेहनत घेऊन तलाव अणि उद्यान नावारुपास आणला. तेव्हा कोणी पुढे आले नव्हते अशी टिका रोडाज गृहसंकुलाचे अध्यक्ष बी.जे.राव यांनी केली.

# गणेशोत्सवानिमित्त कोकण रेल्वे तिकीटासाठी ठाणे रेल्वे स्थानकात दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या

**ठाणे :-** गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर करण्याची ग्वाही खासदार नरेश म्हस्के दिली होती. त्यांच्या पाठपुराव्यामुळे गणेशोत्सवानिमित्त ठाणे रेल्वे स्थानकात कोकण रेल्वेच्या तिकीटासाठी दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या सुरु होणार आहे. खिडक्यांची संख्या वाढल्याने गणेशभक्तांची वेळ आणि रांगेत उभे राहण्याची दमछाक कमी होणार आहे. अतिरिक्त खिडक्या वाढवल्याबद्दल खासदार नरेश म्हस्के यांचे कोकण रेल्वे प्रवासी संघटनेने आभार मानले आहेत. गणेशोत्सव हा कोकणवासीयांचा जिव्हाळ्याचा विषय. नोकरी आणि उद्योगधंद्यानिमित्त लोखो कोकणवासिय ठाणे, मुंबई आणि उपनगरांत स्थायिक झाले आहेत. कोकणी माणूस जगाच्या कोणत्याही कानाकोप्रयात असू द्या गणपतीला दरवर्षी तो गावी जातोच. गणपतीसाठी बहुसंख्य कोकणवासीय कोकण रेल्वेचा पर्याय निवडतात. मात्र आरक्षण खिडक्यांची नगण्य संख्या आणि लांब रांग यामुळे कोकणवासीय मेटाकुटीला येतात. ही बाब लक्षात घेऊन

**खासदार नरेश म्हस्के यांचे प्रवासी संघटनेने मानले आभार**

कोकण रेल्वे प्रवासी संघटनेने ठाणे रेल्वे स्थानकात आरक्षण तिकीट खिडक्या वाढवण्याची मागणी गेले ४ वर्ष लावून धरली होती. खासदार म्हणून निवडून आल्यानंतर संघटनेने ही मागणी नरेश म्हस्के यांच्याकडे करताच अवघ्या काही दिवसांतच हा प्रश्न मार्गी लागला आहे.

खासदार नरेश म्हस्के यांनी मध्य रेल्वेकडे ७ मे २०२५ रोजी या संदर्भात पत्रव्यवहार केला. या पत्राची तातडीने दखल घेत २ जून २०२५ रोजी मध्य रेल्वेचे अप्पर मंडल रेल प्रबंधक तरुण कुमार यांनी पत्राद्वारे २ अतिरिक्त आरक्षण तिकीट खिडक्या ठाणे रेल्वे स्थानकात सुरु करत असल्याची माहिती दिली आहे. २० जून २०२५ ते ५ जुलै २०२५ या दरम्यान या दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या सुरु राहणार आहेत. सध्या ४ आरक्षण खिडक्या कार्यरत असून २ अतिरिक्त खिडक्या सुरु होणार आहेत. ६ आरक्षण खिडक्यांमुळे आता कोकणवासियांची वेळ वाचणार असून रांगेत जास्त वेळ ताटकळत रहावे लागणार नसल्याने प्रवासी संघटनेने आनंद व्यक्त केला आहे. आपल्या खासदारकीच्या पाहिल्याच टर्ममध्ये खासदार नरेश म्हस्के यांनी अनेक रेल्वे विषयक प्रश्न मार्गी लावले असल्याबद्दल प्रवासी संघटनेने समाधान व्यक्त केले आहे.

# दोन दलाल महिला जेरबंद, तीन पीडित महिलांची सुटका

**ठाणे:-** 'वेश्या व्यवसाय करवून घेणाऱ्या दोन दलाल महिलांना ठाणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेने जेरबंद केले. या कारवाईत तीन पीडित महिलांची सुटका करण्यात या पथकाला यश आहे. ही कारवाई गुरुवारी (ता.०५) रोजी उल्हासनगर येथे करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

उल्हासनगर ४,कृष्ण नगर येथे दोन महिला दलाल काही पिडीत व असहाय्य महिलांना फुस लावुन वेश्यागमनासाठी बोलवणार आहे.अशी माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांना माहिती मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून दोन दलाल महिलांना ताब्यात घेवुन त्यांच्या ताब्यात असलेल्या ०३ पिडीत महिलांची सुटका केली आहे.

याप्रकरणी

त्या दोन महिला दलालांविरोधात विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ चे कलम १४३(१), १४३(३), ३(५) सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ३, ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. पुढील अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध वक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# ओवळा-माजिवडा क्षेत्रातील विविध विकासकामे १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करावीत

**ठाणे :-** ठाणे महापालिका क्षेत्रात ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या कामांपैकी बहुतांश कामे प्रगतीपथावर असून त्यांचे उद्घाटन १५ ऑगस्टपर्यंत करण्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणांनी नियोजन करावे, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.ठाणे महापालिका क्षेत्रातील विविध विकास कामे व शासनाकडील मंजूर निधी खर्च करणे, एमएमआरडीएच्या माध्यमातून होणाऱ्या रस्त्यांचा आढावा घेणे आणि घोडबंदर येथील रस्त्यांची कामे आदी विषयाबाबत आढावा बैठकीचे आयोजन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे महापालिका मुख्यालयात कै. अरविंद पेंडसे सभागृह येथे गुरूवारी करण्यात आले होते.

या बैठकीस, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे, एमएमआरडीएचे संचालक (प्रकल्प) अनिल साळुंखे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे अधिक्षक अभियंता विनय सुर्वे यांच्यासह महापालिका, एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

घोडबंदर रोड आणि परिसरात सुरू असलेल्या सर्व कामांमुळे येत्या काही महिन्यात या भागाचे चित्र आणखी बदललेले दिसणार आहे. त्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय साधून कामे मार्गी लावावीत, असे परिवहन मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.तसेच, पावसाळ्यात पाणी साठू नये, घोडबंदर भागातील गावांना पावसाच्या पाण्याचा त्रास होऊ नये यासाठी, सर्व यंत्रणांनी सतर्क रहावे. त्यादृष्टीने, महापालिकेने या भागात २२ कल्व्हर्टची साफसफाई केली आहे. त्यात, चार कल्व्हर्ट पूर्णपणे बुजलेले होते तेही साफ करण्यात आले आहे. त्याचा पावसाळ्यात निश्चितपणे फायदा होईल, असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. गायमुख रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक भूसंपादनाचा अभ्यास आतापासूनच करावा, अशी सूचनाही त्यांनी केली.

ठाणे महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या गायमुख कचरा प्रकल्प, नागला बंदर येथील आरमार केंद्र, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मृती उद्यान व डिजिटल अक्वेरियम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन आणि विपश्यना केंद्र, धर्मवीर आनंद दिघे क्रीडा संकूल, लता मंगेशकर संगीत गुरुकुल आदी प्रकल्पांचा आढावाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला.

तसेच, १२ उद्याने, तरण तलाव, तलाव सुशोभिकरण, कला दालन, स्मशानभूमी, समाज भवन, आगरी-कोळी भवन, फुटबॉल टर्फ, येऊर येथील आदिवासी संस्कृती केंद्र, प्नस्तावित नाल्यांची बांधकामे, अमृत पाणी पुरवठा योजना, जुन्या विहिरींचे पुनरुज्जीवन याही प्रकल्पांच्या सद्यस्थितीचा आढावा प्रताप सरनाईक यांनी घेतला. त्याचबरोबर, एमएमआरडीएमार्फत १९ रस्त्यांची कामे करण्यात येत आहेत. त्यातील रस्त्यांचे सर्वेक्षण झाले असून २ रस्त्यांची कामे सुरू झाली आहेत. एकूण भूसंपादनापैकी ४६ टक्के भूसंपादन बाकी असून त्यास महापालिका प्राधान्य देईल, असे या महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले. तसेच, १५ ऑगस्टपर्यंत उद्घाटन करण्याच्या दृष्टीने सर्व विभागांनी तयारी करावी, असेही निर्देश आयुक्त राव यांनी दिले.



**ठाणे महापालिका, एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची आढावा बैठक**

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले यंत्रणांना निर्देश**

# शिवराज्याभिषेक सोहळा जिल्हा परिषद ठाणे येथे जल्लोषात साजरा

**ठाणे:** - छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन म्हणजेच शिवस्वराज्य दिन जिल्हा परिषद, ठाणे येथे आज अत्यंत उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. ६ जून १६७४ या दिवशी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. स्वराज्य, सार्वभौमत्व आणि स्वाभिमानाचे प्रतीक ठरलेल्या या ऐतिहासिक घटनेचा स्मृतिदिन म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर शासन निर्देशानुसार शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात येतो.

जिल्हा परिषद ठाणेच्या आवारात आयोजित या कार्यक्रमाची सुरुवात प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, राजमाता व महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. यानंतर मानाची स्वराज्यगुढी उभारून वंदन करण्यात आले. उपस्थितांनी राष्ट्रगीत व राज्यगीत गायन करत ‘छत्रपती शिवाजी महाराज की जय!’ च्या घोषणांनी परिसरात उत्साही वातावरण निर्माण केले. या वेळी मार्गदर्शन करताना प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे म्हणाल्या, ठछत्रपती शिवाजी महाराजांकडून मिळणारी प्रेरणा ही आपल्या प्रामाणिक आणि चिकाटीच्या कार्यपद्धतीची मूळ प्रेरणा आहे. प्रत्येक अडचणीवर मात करत कार्य करत राहणे हेच खरे शिवस्वराज्य साध्य करण्याचे माध्यम आहे.ठ त्यांनी उपस्थित सर्वांना शिवराज्याभिषेक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) अविनाश फडतरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ डकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. परगे, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) संदीप चव्हाण, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग प्रमुख प्रकाश सासे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) देविदास महाजन, बालविकास प्रकल्प अधिकारी धनश्री साळुंखे, पशुसंवर्धन विभाग प्रमुख (प्रभारी) डॉ. किर्ती डोईजोडे यांच्यासह सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी रविंद्र तरे व त्यांच्या समूहाने देशभक्तिपर गीत व पोवाडा सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल सूर्यवंशी यांनी प्रभावीपणे केले.



# ठाणे जिल्ह्यात कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून ४४९० नागरिकांची तपासणी

## २३७ संशयित रुग्णांची नोंद

**ठाणे :-** ठाणे जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, दर्जेदार व सहजसुलभ करण्याच्या दृष्टीने शासनातर्फे कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम राबवली जात आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात कर्करोग मोबाइल व्हॅन कार्यरत असून, नागरिकांना कर्करोग तपासणीसाठी सुविधा उपलब्ध होत आहे. जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली या व्हॅनचे प्रभावीपणे संचालन केले जात आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोबाइल व्हॅनद्वारे मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग यांसारख्या प्रमुख कर्करोगांची तपासणी केली जात आहे. ही व्हॅन आधुनिक उपकरणांनी सुसज्ज असून, ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना प्राथमिक तपासणीसाठी रुग्णालयात न जाता त्यांच्या परिसरातच ही सेवा मिळते.

फेब्रुवारी २०२५ व मे २०२५ या दोन महिन्यातील कालावधीत एकूण ४४९० नागरिकांची तपासणी करण्यात आली असून, त्यामध्ये २३७ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. या संशयित रुग्णांना पुढील निदान व उपचारासाठी संबंधित आरोग्य संस्थांकडे पाठविण्यात आले आहे.

कर्करोग हा असंसर्गजन्य आजार असून त्याचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. परंतु वेळीच निदान झाल्यास योग्य उपचाराद्वारे रुग्णाचे आयुष्य वाचवता येते. याकरिता कर्करोग मोबाइल व्हॅन उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

# महा आवास अभियान अंतर्गत पुरस्कार वितरण सोहळा व लाभार्थी मेळावा उत्साहात पार पडला



**कल्याण पंचायत समितीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांची उपस्थिती**

**ठाणे:** - माजी केंद्रीय मंत्री ग्रामीण विकास, कृषी व किसान कल्याण मंत्रालय भारत सरकार यांच्या शुभहस्ते प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत लाभार्थी मेळावा व महा आवास अंतर्गत २०२२-२३ राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा निमित्त ठाणे जिल्ह्यातील पाच पंचायत समिती स्थरावर लाभार्थी मेळावा पार पडला. श्री. शिव छत्रपती क्रिडा संकुल, बालेवाडी, पुणे येथिल कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपणामार्फत ठाणे जिल्ह्यातील पाच पंचायत समिती कल्याण, अंबरनाथ, भिवंडी, मुरबाड, शहापूर येथे मोठ्या प्रमाणात लाभार्थी उपस्थित राहिले.

केंद्रीय मंत्री ग्रामीण विकास, कृषी व किसान कल्याण मंत्रालय भारत सरकार शिवराज सिंह चौहान, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य अजित पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ग्रामविकास राज्य मंत्री योगेश कदम तसेच आदी मान्यवर बालेवाडी, पुणे येथे उपस्थित होते.

या कार्यक्रमास पंचायत समिती, कल्याण येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यांच्या उपस्थितीत संबंधित ग्रामपंचायती, गट विकास अधिकारी (पंचायत समिती, कल्याण) संजय भोये, सहाय्यक गट विकास अधिकारी (पं. स. कल्याण) रघुनाथ गवारी, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी (सांखिकी) संतोष पांडे, विस्तार अधिकारी पराग भोसले, विस्तार अधिकारी प्रशांत गजाकोस, अधिकारी व कर्मचारी, ग्रामपंचायत अधिकारी तसेच लाभार्थी यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला तसेच आवास योजनेबाबत लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.बालेवाडी, पुणे येथील कार्यक्रमात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या तालुके, ग्रामपंचायती, वसाहती व विभागीय स्तरावरील विविध घटकांना सन्मानित करण्यात आले. राज्य सरकारच्या ग्रामीण विकास विभागाच्या वतीने हा उपक्रम पार पाडण्यात आला.

पाच पंचायत समिती स्थरावर महा आवास अभियान अंतर्गत पुरस्कार वितरण सोहळा व लाभार्थी मेळाव्यात लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. या मेळाव्याचे आवास संदर्भात माहिती मिळण्यासाठी लाभार्थ्यांना लाभ झाला आहे व पुढील काळात घरकुलाचे काम जलद गतीने पुर्ण करण्याकरीता यांचा लाभ होईल, असे मत प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात सहभागी लाभार्थ्यांनी आपले अनुभव सांगितले आणि शासनाच्या घरकुल योजनेमुळे मिळालेल्या घरामुळे त्यांच्या जीवनात झालेले सकारात्मक बदल उलगडले.



# साधारण पाच लाख लोकसंख्येच्या दिवा शहरात

# ठाणे महापालिकेच्या अवघ्या ६ शाळा, तर ५५ हुन अधिक अनधिकृत शाळा

**दिवा:-** एकीकडे ठाणे महानगरपालिका अनधिकृत शाळांचे बॅनर दिवा शहरातील रस्त्यांवर लावत असताना दुसरीकडे याच महापालिकेने दिवा शहराची लोकसंख्या वाढत असताना शहरातील महापालिका शाळांची संख्या त्या तुलनेत वाढवली नसल्याची बाब समोर येत आहे.साधारण पाच लाख लोकसंख्येच्या दिवा शहरासाठी अवघ्या सहा शाळा अस्तित्वात असून दिवा प्रभाग समिती कार्यक्षेत्रात पालिकेच्या एकूण १४ शाळा असल्याची बाब समोर येत आहे.तर दुसरीकडे दिवा शहर परिसरात ५८ अनधिकृत शाळा असल्याची माहिती समोर येत आहे.

दिवा शहर आणि परिसरात दिवा स्टेशन शाळा क्रमांक ७९, शाळा क्रमांक ९८, साबेगाव शाळा क्रमांक ८० बेतवडे शाळा क्रमांक ८३, आगासन शाळा क्रमांक ८८, दातिवली शाळा क्रमांक ९४ या पालिकेच्या शाळा असून प्रभाग समिती कार्यक्षेत्रात खिडकाळी, डायघर, पडले गाव, खर्डी पाडा, वेताळ पाडा, फडके पाडा,शीळगाव अशा एकूण १४ शाळा सुरू आहेत. पालिकेच्या शाळांपेक्षा दिवा शहरात अनधिकृत शाळांची संख्या ही दहा पटीने अधिक आहे.दिवा शहरात राहणारा सर्वसामान्य नागरिक हा नोकरदार वर्ग आहे. परिणामी या वर्गाला महागड्या खाजगी शाळा मधील शिक्षण परवडत नाही. दिव्यात हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या अधिकृत खाजगी शैक्षणिक संस्था आहेत. या शाळांची फी सर्वच सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडेल अशी नाही. एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात ठाणे महानगरपालिकेने देखील दिवा शहरात शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन दिवा शहरात ठाणे महानगरपालिकेच्या शाळांची संख्या वाढायला हवी होती.त्याचबरोबर असलेल्या शाळांमध्ये वर्ग संख्या देखील वाढवायला हवी होती.मात्र महापालिकेकडून अपुऱ्या शैक्षणिक सुविधा दिवा शहरात उपलब्ध असल्याने दिवा शहरात अनधिकृत शाळांचे पेव वाढले.परिणामी गल्लीबोलात सुरू झालेल्या आणि कमी फी असणाऱ्या अनधिकृत शाळांमध्ये दिवा शहरातील पालक वर्ग आपल्या पाल्याचे ॲडमिशन घेताना दिसू लागले. एकीकडे महापालिका दिवा शहरातील अनधिकृत शाळांची यादी जाहीर करत असताना पर्यायी व्यवस्था नागरिकांसाठी व पाल्यांसाठी काय? याकडे मात्र ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाने डोळेझाक केलेली पाहायला मिळते.

दिवा शहरातील नोकरदार वर्ग लक्षात घेऊन त्या तुलनेत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची जबाबदारी असताना केवळ अनधिकृत शाळांचे बॅनर लावून शिक्षणासारखा महत्त्वाचा प्रश्न असाच अधांतरी ठेवता येईल का ? हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो. पालिकेने स्वतः:च्या शाळांची संख्या न वाढवता फक्त अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेऊ नका असे बॅनर पालिके मार्फत लावणे हे खाजगी शाळांच्या पथ्यावर पडणारे धोरण नाही का? असाही प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. जर तुम्ही अनधिकृत शाळा बंद करा असे म्हणत असाल तर ठाणे महानगरपालिकेने स्वतः:च्या शाळांची संख्या वाढवायला हवी किंवा अनधिकृत शाळा असणाऱ्या शाळांना नियमांची पूर्तता करून अधिकृत करायला हवे अशी ही भूमिका आता दिवा शहरातील नागरिक मांडताना दिसतात. एकंदरीत ठाणे महानगरपालिकेच्या शैक्षणिक धोरणाचा फज्जा दिवा शहरात उडाला असून वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत दिवा शहरात शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास ठाणे महानगरपालिका अपयशी ठरल्याचे स्पष्ट होत आहे.

**लोकसंख्येच्या प्रमाणात पालिका शाळांची संख्या न वाढल्याने दिव्यात अनधिकृत शाळांची संख्या वाढली-ज्योती पाटील**
**दिवा प्रभाग समिती क्षेत्रात महापालिकेच्या १४ शाळा, अनधिकृत शाळांची संख्या ६० च्या वर**

मागील काही महिन्यांपासून दिवा शहरातील महापालिका शाळांची संख्या वाढवावी यासाठी मी पालिका आयुक्त आणि शिक्षण अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करत आहे. तसा पत्रव्यवहार केला आहे.मात्र अद्याप दिवा शहरातील महापालिका शाळांची संख्या वाढलेली नाही. दिवा शहरातील महापालिका शाळांची संख्या वाढली तर येथील पालकांना मोठा दिलासा मिळेलठ

**- ज्योती राजकांत पाटील शहर संघटिका, शिवसेना(ठाकरे गट)**

# मोघरपाडा ते नागलाबंदर नाल्याची तब्बल १५ वर्ष साफसफाई नाही

## नाल्यातील गाळ पालिका मुख्यालयाच्या दारात टाकण्याचा मनसेचा इशारा

**ठाणे :-** घोडबंदर रोडवरील ओवळा, कासारवडवली या परिसरात झपाट्याने मोठमोठी गृहसंकुले उभारली जात आहेत. या गृहसंकुलांतील सांडपाणी मोघरपाडा गाव ते नागलाबंदर खाडीपर्यंत विस्तिर्ण असलेल्या नाल्यात सोडले जात आहे. गेल्या १५ वर्षात या नाल्याची साफसफाईच झाली नसल्याची धक्कादायक माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे घोडबंदर रोड विभाग अध्यक्ष किरण रामकृष्ण पाटील यांनी ठाणे महापालिका आयुक्तांच्या निदर्शनास आणून देत सफाई न झाल्यास नाल्यातील गाळ पालिका मुख्यालयाच्या दारात टाकण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. घोडबंदर रोडवरील ओवळा, कासारवडवली हा परिसर झपाट्याने विकसित होत असुन उंच उंच टॉवर उभारले जात आहेत. सर्व गृहसंकुलांचे सांडपाणी मोघरपाडा गाव ते नागलाबंदर पर्यंत विस्तारलेल्या नाल्यामध्ये सोडले जात आहे. हा नाला मोघरपाडा गावापासून मौजे मोघरपाडा सर्व्हे नंबर ३० मधुन पुढे नागलाबंदर खाडीपर्यंत जातो. मोघरपाडा गाव ते नागलाबंदर ही पुर्वीपासुन एक छोटी खाडी होती व पुर्वी या खाडीचे पाणी शुद्ध होते आणि मोघरपाडा व इतर गावांतील स्थानिक गावकरी मच्छीमारी करून आपला उदरनिर्वाह



करत होते. परंतु जसा जसा परिसरात गृहसंकुले उभारली जाऊ लागली तशी या खाडीचे नाल्यामध्ये रुपांतर झाल्याची माहिती किरण रामकृष्ण पाटील यांनी ठाणे महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात दिली आहे. १५ वर्ष झाली तरी या नाल्याची अद्याप सफाई झालेली नाही. स्थानिक लोकप्रतिनिधींनी पण विकासकांच्या फायद्यासाठी या गोष्टीकडे कानाडोळा केला. पावसाळ्यात दरवर्षी नाल्याचे पाणी ओव्हरफ्लो होऊन मौजे मोघरपाडा सर्व्हे नंबर ३० व इतर सर्व्हे नंबर मधील शेतांमध्ये जाऊन शेतीचे आतोनात नुकसान होत आहे. नाल्यातील गाळ काढुन सफाई केली नाही तर पावसाळ्यात पुरपरिस्थिती निर्माण होऊ शकते व नागरीकांचे आरोग्य सुद्धा धोक्यात येऊ शकते. येत्या १५ दिवसात गाळ साफ करण्याचे काम न झाल्यास सदरचा गाळ डंपरमध्ये टाकून ठाणे महानगरपालिकेच्या गेटवर टाकण्यात येईल व तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा किरण रामकृष्ण पाटील यांनी दिला आहे.